# संवादिनी

जाणीव व वंचित विकासचे मासिक संवादपत्र

* वर्ष १३ वे * * सप्टेंबर - नोव्हेंबर २०२२ * * प्रसिद्धी- डिसेंबर २०२२
अंक : दुसरा


सादर नमस्कार,

३१ डिसेंबर ....
जल्लोष आणि जल्लोष
शुभेच्छांचा पाऊस
चांदण्यांना फिके पाडणारी
विद्युत रोषणाई ....
रात्रीचा दिवस
अन् दिवसाची रात्र
नवीन वर्षाचे स्वागत
सरत्या वर्षाला निरोप
त्याच उत्साहात
सारे काही
शिळ्या कढीला ऊत् .....
शिळी कढी तशीच राहते
उतते आणि मातते.
प्रकर्षाने पसरते.
या सर्वात हरवलेला असतो
तो अखेरचा माणूस
ज्याच्या अस्तित्त्वाचेच प्रश्नचिन्ह झालंय !

---

## नवीन वर्षाच्या
## हार्दिक शुभेच्छा!
## २०२३

## शिक्षकदिन

दि.५सप्टेंबर २०२२ रोजी शिक्षक दिनानिमित्त चंडिकादेवी कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र,पाटणबोरी येथे नर्सिंग बॅच क्र.५ च्या प्रशिक्षणार्थिंनी शिक्षक दिन साजरा केला. यावेळी मुलींनी शिक्षिकांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. ४ मुलींनी शिक्षिकांची भूमिका साकार करुन वर्ग घेतला. याच दिवशी प्रशिक्षणार्थी मुलींना अभ्यासक्रम पुस्तकांचा संच देण्यात आला. यावेळी १२ मुली उपस्थित होत्या.

## अभया अभियान

* दि.२६ सप्टेंबर २२ रोजी 'अभया मनातली' या हेल्पलाईनचे उद्‌घाटन निर्मळ रानवारा मासिकाच्या विशेष संपादक श्रीमती ज्योती जोशी यांच्या हस्ते झाले.

**स्त्रियांना सन्मान दिला पाहिजे हे जनमानसात रूजविण्यासाठी संस्थेच्या कार्यक्षेत्रामध्ये विविध ठिकाणी अभया अभियाना अंतर्गत सही मोहिम सुरु असून आत्तापर्यंत पाच हजारहून अधिक सह्या गोळा झाल्या आहेत. १लक्ष सह्यांचे उद्दिष्ट ठेवले आहे.**

ही हेल्पलाईन अनेकांना दिलासा देणारी ठरेल असा विश्वास वाटतो.




*** दि. २९ सप्टेंबर २२ रोजी आपण संपूर्ण महाराष्ट्रात जे अभया अभियान सुरू केले आहे. यासंबंधी पत्रकार परिषद घेण्यात आली. याला सर्व माध्यमांनी चांगला प्रतिसाद दिला.**



मुंबई तरुण भारत

Pune Edition | 2022-09-30 | Page- 3
epaper.mahamtb.con

### महिलांच्या सन्मानासाठी 'अभया अभियान'

पुणे, दि. २९ (प्रतिनिधी): महिलांच्या सन्मानासाठी आता एक अनोखे अभियान राबविले जाणार आहे. 'वंचित विकास संस्था' 'अभया अभियान' हाती घेणार असल्याची माहिती संस्थेच्या कार्यवाह, संचालक मीना कुर्लेकर यांनी येथे दिली.

विधवा, परित्यक्ता, एकटी बाई, घटस्फोटित, नवरा सोडलेली, नवऱ्याने टाकलेली, बिना लग्नाची असे शब्द वापरून एकल महिलांचा अपमान केला जातो. अशा शब्दांचा त्या व्यक्तीवर सखोल परिणाम होत असतो. ही गंभीर बाब लक्षात घेऊन हे अभियान राबविले जाणार आहे.

संघर्षमय परिस्थितीचा सामना करत निर्भयपणे उभी राहणारी स्त्री म्हणजे 'अभया' असते. तेव्हा संघर्ष वाट्याला आलेल्या अशा स्त्रियांना आपण 'अभया' म्हणायला हवे. अपंगांसाठी दिव्यांग, मतिमंद यासह प्राण्यांच्या बाबतीत 'श्वान', 'वराह' असे सन्मानजनक शब्द आपण वापरतो आहोत. मग या स्त्रियांच्या बाबतीत भाषिक संवेदनशीलता दाखवायला हवी की नको, याचा विचार आपण केला पाहिजे, असे मीना कुर्लेकर यांनी यावेळी बोलताना सांगितले.

#### 'अभया'साठी संवाद सुविधा

खुपदा अशा महिलांना आपल्या भावना, मन व्यक्त करायचे असते. मात्र, कोणाशी बोलावे हे समजत नाही. यासाठी संस्थेच्यावतीने 'अभया'शी संवाद साधायला 'अभया-मनातली' ही सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. ज्यांना हा मुक्तसंवाद करायचा असेल, त्यांनी ९३७०८२५३६८ या नंबरवर संपर्क साधावा. ही सुविधा पूर्णपणे मोफत आणि गोपनीय आहे, असे सुनीता जोगळेकर यांनी सांगितले.

## ऐलमा,पैलमा गणेश देवा आणि दांडिया

* दि.१ऑक्टोबर २२ रोजी हिंदू महिला सभेच्या वतीने शिवाजी मंदिर,सदाशिव पेठ,पुणे येथे सकाळी १० ते १२ या वेळात फुलवातील मुलांना नवरात्रीनिमित्त आमंत्रित केले होते. फुलवातून १२ मुले व ५मुली अशा एकूण १७ मुलामुलींनी सहभाग घेतला. हिंदू महिला सभेच्या तर्फे मुलांना रायटिंग पॅड,पेन-पेन्सिल,रबर,शार्पनर,ड्रॉईंग बुक, लोकरी टोपी,बॅग इ.भेटवस्तू दिल्या.

* रविवार दि. २ऑक्टोबर २२ रोजी नवरात्रीनिमित्त अभयाच्या सख्यांचा दांडियाचा कार्यक्रम झाला. सर्वजणी मनसोक्त दांडिया खेळल्या. याच दिवशी नवरात्रीनिमित्त मेंदी काढण्यासाठी मृगनयनी मेंदी आर्टच्या श्रीमती धनश्री हिंदवे व त्यांच्या सहकारी आल्या होत्या. त्यांनी सर्वांना सुरेख मेंदी काढली.

## नवरात्रीनिमित्त सरस्वतीचा सन्मान

* संस्थेचे वैद्यकीय अधिकारी डॉ.शिरीष चनगुंडी यांच्या मातोश्री डॉ.शैलजा चनगुंडी यांच्या सन्मानाचा कार्यक्रम केंद्र कार्यालयात दि.२९ सप्टेंबर २०२२ रोजी आयोजित केला होता. यावेळी त्यांनी सहज,साध्या शैलीमध्ये आपले मनोगत व्यक्त केले व आपला जीवन प्रवास सांगितला. यातून उपस्थितांना प्रेरणा आणि सकारात्मकतेचा संदेश मिळाला.

* दि.२०नोव्हेंबर २२ रोजी एकता मित्र मंडळ,अरण्येश्वर,तावरे कॉलनी येथे एकता अभया मैत्री गटाची सभा झाली.

यामध्ये विविध विषयांवर सामुहिक चर्चा झाली. महिलांनी आपले शारीरिक आरोग्यासोबतच मानसिक आरोग्य जपणे व स्वतःच्या कलागुणांना वाव देणे यावर चर्चा झाली. याचवेळी महिलांसाठी बचतगट स्थापन करण्यात येणार असल्याबद्दल माहिती दिली. महिलांनी असे सुचविले की, प्रशिक्षण तज्ञांचे सल्ला व मार्गदर्शन देणारे कार्यक्रम घेण्यात यावे.

## कार्यशाळा

* दि.१२ सप्टेंबर २२ रोजी अभिरुची वर्गाच्या ताईंसाठी केंद्र कार्यालयात कार्यशाळा आयोजित केली होती. श्री शमशुद्दिन शेख यांनी कोबो या ॲपची माहिती सर्व ताईंना दिली. अभिरुची वर्गात येणाऱ्या मुलांची माहिती या ॲपव्दारे कशी घेता येईल हे सांगितले. प्रत्यक्ष फॉर्म भरुन घेतला. अभिरुची वर्गाच्या समन्वयक श्रीमती स्नेहल मसालिया यांनी ताईंना मुलांसाठी नवीन खेळ शिकवले.

* ७ ऑक्टोबर २२ रोजी संस्थेच्या केंद्र कार्यालयात दिवाळीच्या निमित्ताने आकाशकंदिल तयार करण्याची कार्यशाळा आयोजित केली होती. ही कार्यशाळा श्रीमती गौरी जाधव यांनी घेतली. अभिरुची वर्गाच्या ११ ताई, आणि इतर १४ कार्यकर्ते असे एकूण २५ कार्यकर्ते या कार्यशाळेत सहभागी झाले होते.

* दि.६ऑक्टोबर २०२२ रोजी जिल्हा परिषद प्रशाला सारोळा, मांडवा,वाशी येथे किशोरवयीन मुलामुलींसाठी व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री राजकुमार गुंजाळ, श्री तानाजी कुंभार, श्री रामभाऊ लगाडे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी २५ ते ३० मुलेमुली उपस्थित होती.

* दि.२९ नोव्हेंबर २२ रोजी जगदाळे मामा प्राथमिक विद्यामंदिर,वाशी येथे युवक युवतींसाठी व्यक्तिमत्व विकास मेळावा घेण्यात आला. यावेळी संस्थेचे कार्यकर्ते श्री रामभाऊ लगाडे यांनी व्यक्तिमत्व विकास, नेतृत्व कौशल्य, वक्तृत्व कौशल्य याविषयांवर मार्गदर्शन केले. ७४ युवक-युवती यामध्ये सहभागी झाले.

## आरोग्यविषयक मार्गदर्शन

दि.२३ नोव्हेंबर २२ रोजी अभया गटातील महिलांसाठी उतारवयात तब्येतीची घ्यावयाची काळजी यावर डॉ. प्रविण पगारिया यांनी मार्गदर्शन केले. यावेळी बी पी, शुगर,मानसिक व शारीरिक आरोग्य, घरगुती उपचार, सकस आहार, ॲसिडिटी, सांधेदुखी, संधीवात इ. बाबत मार्गदर्शन केले. यावेळी ३५हून अधिक महिला यावेळी उपस्थित होत्या.

## एक पणती सैनिकांसाठी

* कलातीर्थ,पुणे या संगीत चित्रकला विद्यालयातर्फे दिवाळीनिमित्त आयोजित केलेल्या कार्यशाळेसाठी पुण्यातील ८अभिरुची वर्गातील एकूण ५० मुलेमुली सहभागी झाली होती. यावेळी प्रत्येक मुलाने २ पणत्या सैनिकांसाठी तर २ पणत्या स्वतःच्या घरी नेण्यासाठी रंगविल्या. या पणत्या, शुभेच्छापत्र, फराळ इ.भारतीय सैनिकांपर्यंत पोहोचवून सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली गेली.

* दि.१७ ऑक्टोबर २२ रोजी नीहार आनंद निवास,लोहगाव,पुणे येथे मुलांबरोबर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी नाट्य अभिनय कार्यशाळा आयोजित केली होती. ही कार्यशाळा नाट्य क्षेत्रातील श्री प्रसाद वनारसे यांनी घेतली. त्यांनी यावेळी

खेळ,ॲक्टिव्हिटी,गटचर्चा,गटकार्य यांच्या माध्यमातून अभिरुची वर्गातील मुलांच्या अभिनय कौशल्याला वाव देण्यासाठी काय व कसे मार्गदर्शन करावे यासाठी या कार्यशाळेचे आयोजन केले होते.एकूण १७ कार्यकर्ते तसेच निर्मळ रानवारा मासिकाचे सल्लागार श्री श्रीराम ओक कार्यशाळेसाठी उपस्थित होते.

**प्रदर्शन**

* दि.९ ऑक्टोबर २२ रोजी गरवारे बालभवन,पुणे आयोजित मुलांसाठी आणि मोठ्यांसाठी पर्यावरणपूरक वस्तूंच्या प्रदर्शनाला अभिरुची वर्गातील मुलांनी भेट दिली. प्रदर्शनात तांबे, मातीची भांडी, लाकडी वस्तू आणि खेळणी, कॉटन पिशव्या, कापडी वस्तू, ड्रेस मटेरियल्स, गोधड्या, स्वेटर, लहान मोठ्यांचे तयार कपडे, इकोफ्रेंडली गिफ्ट हँपर, आकशकंदिल, मंडला फ्रेम, फोल्डिंगचे किल्ले, सोलर कुकर, बांबू दिवा, गोमय उत्पादने, अपसायकलिंग केलेल्या वस्तू आणि अनेक सुंदर उत्पादने, सेंद्रिय धान्य, पिठं, चटण्या, सरबतं, चविष्ट खाद्यपदार्थ, बालभवनची आणि इतरही सुंदर पुस्तकं, सुरेख कापडी पाकिटं, किल्ल्यांची खेळणी, मुलांसाठी टाकाऊ वस्तूंपासून केलेली सुंदर वैज्ञानिक खेळणी, कम्पोस्ट खत, शाडूची माती आणि चटकदार खाऊचे स्टॉल होते. मुलांची अशा प्रकारच्या प्रदर्शनाला प्रथमच भेट होती.

**दिपोत्सव**

* दि.२१ऑक्टोबर २०२२रोजी निरामय समूह,पुणे यांचेतर्फे ४ ते १४ वयोगटातील वंचित आणि दिव्यांग मुलांसाठी दिपोत्सवाचे आयोजन भावे प्राथमिक शाळा,पुणे येथे केले होते. यासाठी १० अभिरुची वर्गातील ७४ मुला-मुलींनी सहभाग घेतला. यावेळी श्रीमती मधुरा आफळे यांनी कथ्थक नृत्य सादर केले. मुलांचे विविध खेळ घेतले. जादूचे प्रयोग दाखवले. मुलींनी पावभाजीचा आनंद घेतला. तसेच सर्वांना दिवाळीचा फराळ दिला. मुलांना खूप मजा आली.
* डॉ. नितिन बोरा, श्री नितिन करंदीकर, श्री नितिन सोहनी, श्री महेश टेंभेकर,जमीर शेख,पुणे यांच्या सहकार्याने मांगणीवाडी, खंडोबावाडी,शिवेचीवाडी,खामणगाव, ठाकरवाडी, जुन्नरमधील अर्धबेघर, भूमीहीन ६७४ लोकांना दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले.

**रानवारा दिवाळी अंक २०२२ प्रकाशन**

* दि.२२ऑक्टोबर २२ रोजी संस्थेच्या केंद्र कार्यालयात निर्मळ रानवारा दिवाळी अंकाचे प्रकाशन प्रांजल,प्रितल, अनम या मुलांच्या हस्ते आणि संस्थेचे अध्यक्ष श्री विजयकुमार मर्लेचा, चित्रकार श्रीमती सुप्रिया जोगदेव,रानवाराच्या संपादक श्रीमती ज्योती जोशी आणि श्रीमती सरोज टोळे याच्या उपस्थितीत झाले.

या वर्षीचा दिवाळी अंक बाग-बगीचा या विषयी आहे. त्याबद्दल श्रीमती ज्योती जोशी यांनी माहिती दिली. श्रीमती सुप्रिया जोगदेव यांनी रानवारा आणि त्यांचे नाते कसे जवळचे आहे हे त्यांच्या मनोगतातून सांगितले.

यािवषयाी महाराष्ट्र टाईम्समध्ये प्रसिध्द झालेले वृत्त –



निर्मळ रानवारा

आशयसंपन्न बालसाहित्याचा अनुभव हा अंक देतो. 'आणि झोपाळा बोलू लागला', 'फणस', 'झगमग दिवाळी', 'गच्चीवरील बाग', 'बहिणाबाईंची शाळा', 'सर जगदीशचंद्र बोस', 'झाडे बोलतात', 'भुईफोड', 'आगळी वेगळी फुले', 'मजेदार कोडी', 'ताजगीची परसबाग', 'फुलवेडी डच माणसं', 'हे करून पाहा', 'एकमेकां साह्य करू', 'आणि भुंगे' असे विविध लेख या अंकात आहेत. चार ते १२ वयोगटाच्या दृष्टीने केलेले लेखन या अंकात आहे. मुलांना डिजिटल विश्वापासून जरा दूर नेऊन कसदार साहित्याचा अनुभव हा अंक देतो.

संपादक : सुप्रिया कुलकर्णी, पाने : १२४, किंमत : ५० रु.

## ब्रेलच्या प्रकाशात

श्रीमती सरोज टोळे लिखित 'ब्रेलच्या प्रकाशात' या पुस्तकाचे प्रकाशन नगरसेविका श्रीमती माधुरी सहस्त्रबुध्दे व हिंदू महिला सभेच्या अध्यक्ष श्रीमती सुप्रिया दामले यांच्या हस्ते झाले.

यावेळी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष श्री विजयकुमार मर्लेचा व उत्सवमूर्ती श्रीमती सरोज टोळे उपस्थित होत्या.

माधुरीताईंचा आणि सरोजताईंचा जुना ऋणानुबंध आहे. याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना नगरसेविका माधुरी सहस्त्रबुध्दे यांनी पुस्तकाचे सविस्तर परीक्षण सादर केले.

यावेळी बोलताना माधुरीताई म्हणाल्या,'जेव्हा सरोजताईंच्या हातात ब्रेलर आला आणि गंगाने त्यांना ही लिपी शिकविली त्या दिवशीच नवीन सरोजचा जन्म झाला.

**सहा टिंबांची ही प्रचंड दुनिया तिच्यापुढे खुली झाली. त्या प्रकाशात ती स्वतः न्हाऊन निघाली आणि इतरांना प्रकाश देती झाली.'**

श्रीमती सुप्रिया दामले यांनी याप्रसंगी मनोगत व्यक्त केले. लेखिका सरोज टोळे यांनी आपली भूमिका मांडली. यावेळी संस्थेतर्फे सरोजताईंचा माहेरचा सत्कार करण्यात आला. तर घराडी, मंडणगड,जि.रत्नागिरी येथील स्नेहज्योती अंध विद्यालयाच्या संस्थापिका आणि सरोजताईंना अंधांसाठीच्या कामात जोडून घेणाऱ्या प्रतिभाताई सेनगुप्ता यांचा पंच्याहत्तरीनिमित्त हृदय सत्कार सरोजताईंनी केला.

## ओवाळीते भाऊराया...

* ५नोव्हेंबर २२ रोजी लालबत्ती विभागातील शरीरविक्रय करणाऱ्या महिलांचा गणपती मंडळाच्या कार्यकर्त्यांबरोबर भाऊबीजेचा कार्यक्रम झाला. यावेळी लेखिका, कवियत्री श्रीमती अरुणा ढेरे उपस्थित होत्या.

## आमची सहल

* दि.१२,१३नोव्हेंबर २२ रोजी कै.चाफेकर सरांची जयंती आणि बालदिनाच्या निमित्ताने एकदिवसीय सहल नीहार आनंद निवास,लोहगाव,पुणे येथे आयोजित करण्यात आली होती. फुलवा,अभिरुची वर्गातील २२ मुले आणि १५ ताई सहभागी झाले. यामुळे नीहार आनंद निवास गजबजून गेले. झोका, सी सॉ या खेळण्यांचा आनंद मुलांनी घेतला. यावेळी दुपारी स्प्रे पेटिंग, फुग्यांचा खेळ मुलांनी आवडीने खेळला. भेळ आणि कुल्फीने या सगळ्यामध्ये रंगत आणली. रात्री शेकोटीचा कार्यक्रम झाला. मुलांना नीहार आनंद निवासच्या जवळील शिवाजी महाराज संग्रहालय तसेच इंद्रायणी नदी पहायला मिळाली. मुलांना खूप मजा आली.
* दि.१४नोव्हेंबर २२ रोजी वाशी येथील लालबहादूर शास्त्री विद्यालय येथे बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या जीवनाविषयी माहिती दिली. यानंतर बालमेळाव्यामध्ये खेळ, गाणी, गोष्टी तसेच वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धकांना भेट म्हणून लोकमत दिवाळी अंक तसेच निर्मळ रानवाराचा दिवाळी अंक दिला. यामध्ये ८१ मुलामुलींनी सहभाग घेतला.
* दि.१४ नोव्हेंबर २२ रोजी बालदिनानिमित्त एकता मंडळामध्ये बालमेळाव्याचे आयोजन केले. यावेळी मुलांसाठी मनोरंजनाचे कार्यक्रम ठेवण्यात आले. मुलांनी विविध खेळांचा आनंद घेतला. यामध्ये स्वतःची ओळख व स्वतःविषयी थोडक्यात माहिती सांगणे, माझ्या आईचं पत्र हरवलं, लंगडी, पाणी, पकडापकडी, गाण्याच्या भेंड्या, झोपाळा इ. खेळ मुलांनी मनसोक्त खेळले. मुलांसाठी हॉर्स रायडींगचे आयोजन केले होते.

## भारतीय संविधान दिन

दि.२६ नोव्हेंबर २२ रोजी वाशी,मराठवाडा येथील जिल्हा परिषद कन्या प्रशालेमध्ये भारतीय संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मुख्याध्यापक श्री अभिमन्यू धायगुडे यांनी भूषविले. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे कार्यकर्ते श्री रामभाऊ लगाडे होते. भारतीय संविधान दिनाचे महत्व व भारतीय लोकशाही याविषयी श्री रामभाऊ लगाडे यांनी माहिती दिली. भारतीय संविधान या विषयावर वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. यावेळी आठ मुली व दोन मुलांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाला १५० ते २०० मुलेमुली, शिक्षक आणि पालकही उपस्थित होते.

## मध्यप्रदेशातील कामाविषयी

* छिंदवाडा जिल्ह्यातील सौंसर व बिछुआ या दोन तालुक्यांमधील १३ गावांमध्ये दि.१ऑगस्ट २०२२ पासून वंचित विकास संस्थेने स्थगिती दिलेले काम पुन्हा सुरु केले आहे. एकल महिलांच्या प्रश्नांवरील कामास विशेष प्राधान्य दिले जाणार आहे. गुंजी, आलेसूर, देवनदी, राधादेवी, राधादेवीढाना, मैनागोंदी या गावांमध्ये एकल महिलांच्या प्रश्नावर अभ्यास चालू आहे. तसेच परसबागेबाबतची कामेही कार्यक्षेत्रात सुरु आहेत.

## एक राजा माणूस - शरु रांगणेकर

व्यवस्थापन क्षेत्रातील शरु रांगणेकर हे मोठे नाव. भारत अन भारताबाहेरही त्यांनी या क्षेत्रात भरघोस कार्य केले आहे.

अमेरिकन विद्यापीठात व्यवस्थापन क्षेत्रातील उच्च पदवी प्राप्त केल्यावर त्यांनी तेथेच विविध उद्योगांमध्ये उच्च पदे भूषविली. त्यानंतर ते भारतातील अनेक नामवंत आस्थापनांमध्ये उच्च पदावर कार्यरत होते. १९७८ साली सेवानिवृत्त झाल्यावर टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेस अन काही प्रतिष्ठित व्यवस्थापन-संस्थांमध्ये त्यांनी अध्यापनाचे कार्य केले. त्यांनी जवळ जवळ पाच हजार व्यवस्थापनविषयक कार्यशाळा घेतलेल्या आहेत. एक प्रभावी वक्ता अन उत्कृष्ठ लेखक म्हणून त्यांची ख्याती होती.

या सर्वाबरोबर त्यांचे वैशिष्ट्य म्हणजे अनेक सामाजिक संस्थांना ते भरघोस मदत करत असत. उजव्या हाताने केलेली मदत डाव्या हाताला कळू नये याची ते काळजी घेत असत.

वंचित विकास संस्थेला त्यांनी कायमच भरघोस आर्थिक सहकार्य केले. सर्वात महत्वाचे म्हणजे त्यांच्यानंतर त्यांचा हा वारसा त्यांच्या लेकीने पुढे चालवला. सरांना जाऊन दोन वर्ष झाली तरीही दरवर्षी त्यांची लेक स्वाती अडवानी यांच्याकडून नियमित भरघोस देणगी येते हे खूप विशेष आहे. संस्कार पुढच्या पिढीत उतरतात ते असे. अशी उदाहरणं खूप दुर्मिळ,अनुकरणीय व कौतुकास्पद आहेत.

### • आदरांजली •

यशवंत नामजोशी म्हणजे सर्वांचे नामजोशी काका यांचे दुःखद निधन झाले. काका संस्थेचे देणगीदार, हितचिंतक व मित्र होते. संस्थेचा व त्यांचा खूप जुना ऋणानुबंध होता. संस्थेच्या किंवा स्वतःच्या अडचणीच्या वेळेला त्यांच्याशी बोलले तर खूप धीर द्यायचे. त्यांच्याशी बोलून खूप छान वाटायचे. काकांचे व्यक्तिमत्व हे त्यांना भेटणाऱ्या सर्वांच्या मनामध्ये प्रेमळ ठसा उमटवणारे होते.

काकांच्या स्मृतीस सादर प्रणाम !

## सप्टेंबर २०२२ मध्ये आर्थिक स्वरुपात मदत देणारे देणगीदार

१.श्रीमती सुहासिनी बिवलकर,पुणे २.श्री सी.एन.निरगुडे,पुणे ३.श्री शिवप्रसाद आगटे,पुणे ४.श्री विश्वास पराशर,पुणे ५.श्रीमती गीता धोंगडे,पुणे ६.श्रीमती मिनाज कुडचे,अहमदाबाद ७.श्रीमती मुग्धा कटके,पुणे ८.श्रीमती अरुणा निकम,पुणे ९.श्रीमती सुनंदा नेने,पुणे १०.श्री ऋषिकेश निरगुडे,पुणे ११.श्रीमती किशोरी तोरणे,पुणे १२.श्रीमती हिमाली सडेकर,पुणे १३.श्रीमती जयश्री भादेकर,पुणे १४.श्रीमती मेघना कुलकर्णी,पुणे १५.श्री संजय कुडी,पुणे १६.श्रीमती प्रिया रावते,पुणे १७.श्रीमती सुनीता कुलकर्णी,पुणे १८.श्रीमती माधवी पोंक्षे,पुणे १९.श्रीमती शिवांगीनी सोनटक्के,पुणे २०श्रीमती नयन जोगळेकर,पुणे २१.श्री भालचंद्र आपटे,पुणे २२.हिंदु महिला सभा,पुणे २३.श्रीमती अंजली गाडगीळ,मुंबई २४.श्री सुरेश कामत,मुंबई २५.श्री केशव पाटील,मुंबई २६.श्री प्रसाद केसाळे,मुंबई २७.श्रीमती जयश्री ठाकूर,मुंबई २८.श्रीमती सीमा गोगटे,मुंबई २९.श्रीमती सुनीता रणसुभे,मुंबई ३०.श्री निलेश करंदीकर,मुंबई ३१.श्री अरविंद पिंपळेकर,मुंबई ३२.श्री अनंत आपटे,मुंबई ३३.श्री सिध्दार्थ श्रीवास्तव,पुणे ३४.डॉ. संध्या रिसबुड,पुणे,३५.श्रीमती वृंदा रावते,पुणे

## ऑक्टोबर२०२२ मध्ये आर्थिक स्वरुपात मदत देणारे देणगीदार

१.श्री रोहित चौधरी,पुणे २.श्रीमती अंजली गद्रे,पुणे ३.श्री अरविंद धारवाडकर,पुणे ४.श्री मिहिर अर्जुनवाडकर,पुणे ५.श्रीमती कुसुम बीडवाई,पुणे ६.श्री अरविंद बापट,पुणे ७.श्रीमती कृष्णा चोंधे,पुणे ८.श्रीमती तृप्ती फाटक,पुणे ९.मेन्सा इंडिया ट्रायबल,पुणे १०.श्री अविनाश नाडकर्णी,मुंबई ११.श्रीमती वासंती फडके,मुंबई १२.श्री अमोल फणसळकर,पुणे १३.श्री संभाजी गोडसे,पुणे १४.श्रीमती अनघा डोंगरे,पुणे १५.श्रीमती ललितगौरी डांगे,पुणे १६.अरिहंत फूड प्रॉडक्टस,पुणे १७.श्री प्रेमानंद भागणे,पुणे १८.श्री गिरीश दळवी,पालघर,१९.श्री चित्रदीप आरस,पालघर २०.श्री मिलिंद खांडेकर,पुणे २१.श्री अशोक कुंचुर,पुणे २२.श्रीमती शीला देव,पुणे २३.श्री विलास राजवाडे,पुणे २४.श्री चैतन्य मोहरीर,पुणे २५.श्री गिरीश बक्षी,पुणे २६.श्री संजय कुडी,पुणे २७.श्री विजयकुमार मर्लेचा,पुणे २८.श्रीमती राधिका दासरी,पुणे २९.श्रीमती मिनाक्षी नागरे,पुणे ३०.श्रीमती देवयानी गोंगले,पुणे ३१.उस्मानाबाद जनता सहकारी बँक,लातूर,३२.श्रीमती दीपा शहा,पुणे ३३.श्री जबार सिंग,पुणे ३४.श्रीमती सायली क्षिरे,पुणे ३५.श्रीमती इंदुमती कुलकर्णी,पुणे ३६.श्रीमती माधवी कुलकर्णी,पुणे

## नोव्हेंबर २०२२ मध्ये आर्थिक स्वरूपात मदत देणारे देणगीदार

१.श्रीमती सुनंदा पालकर,पुणे २.श्री अरविंद बापट,पुणे ३.श्रीमती मीना कुर्लेकर,पुणे ४.श्री संजय कुडी,पुणे ५.श्रीमती लता लोणकर,पुणे ६.श्री भालचंद्र पटवर्धन,पुणे ७.श्रीमती सुनीता जोगळेकर,पुणे ८.श्रीमती वंदना कुलकर्णी,पुणे ९.श्रीमती राजश्री कशाळकर,पुणे १०.श्रीमती प्रिया हेर्लेकर,पुणे ११.श्रीमती सिमंतीने वझे,पुणे १२.श्री अजय रानडे,पुणे १३.श्री विजयकांत कुलकर्णी,पुणे १४.श्री.शिरीष पांड्ये,मुंबई १५.श्री रामदास हुले,पुणे १६.श्रीमती लीला थिगळे,मुंबई १७.श्रीमती मंदा हुले,पुणे १८.श्री स्वप्निल महाजन,पुणे १९.श्रीमती सुप्रिया दामले,पुणे २०.श्रीमती माधुरी ताम्हाणे,पुणे २१.श्रीमती मनोज दांडेकर,पुणे २२.श्री नितीन जोशी,पुणे २३.श्रीमती मंदाकिनी किंजवडेकर,पुणे २४.श्री संजीव लेले,मुंबई २५.श्री मनोज शहा,मुंबई २६.श्री सुभाष भावे,पुणे २७.श्रीमती सीमा इनामदार,पुणे २८.श्रीमती स्वाती अडवानी,मुंबई २९.श्रीमती स्नेहल घोरपडे,पुणे ३०.श्रीमती अंजली गाडगीळ,मुंबई ३१.श्रीमती आशा थत्ते,मुंबई ३२.श्री पंकज पटवर्धन,पुणे ३३.श्री जयदीप शहा,पुणे ३४.श्री मुकुंद जोग,मुंबई ३५.श्री जयंत साबणे,पुणे ३६.श्रीमती अनुराधा जोशी,पुणे ३७.श्रीमती विशाखा कुलकर्णी,पुणे ३८.श्रीमती आसावरी साठ्ये,पुणे ३९.श्रीमती शुभदा परशुरामे,पुणे ४०.श्रीमती अनिता आगाशे,पुणे ४१.श्रीमती सुधा बेंद्रे,पुणे ४२.श्रीमती विनया मराठे,पुणे ४३.श्रीमती कल्पना वालिके,पुणे ४४.श्रीमती मानसी पाटणकर,पुणे ४५.श्रीमती उमा जोशी,पुणे

## सप्टेंबर २०२२ मध्ये वस्तुरुपाने मदत देणारे देणगीदार

१.श्रीमती प्रतिभा शिंदे,पुणे २.श्री सुशांत सेंजे,पुणे ३.श्री नितीन करंदीकर,पुणे ४.मिलेनियम फाऊंडेशन,पुणे ५.श्रीमती हिमाली शहा,पुणे ६.श्रीमती कल्पना जोशी,पुणे ७.श्री विवेक कर्वे,पुणे ८.श्रीमती नेहा पटवर्धन,पुणे ९.श्रीमती वैजयंती पटवर्धन,पुणे १०.श्रीमती गौरी माडीवाले,पुणे ११.श्री विजयकुमार मर्लेचा,पुणे १२.श्रीमती अपर्णा ताटके,पुणे १३.श्रीमती माधवी पोंक्षे,पुणे १४.श्रीमती अरुणा निकम,पुणे १५.श्रीमती पल्लवी शेवाळे,पुणे १६.श्रीमती श्रुती साळुंके,पुणे १७.श्री नंदू चिवटे,पुणे १८.श्रीमती मेघना कुलकर्णी,पुणे १९.श्रीमती विनिता अंबिके,पुणे २०.श्रीमती संजीवनी तांबे,पुणे २१.श्री मुकुंद अत्रे,पुणे २२.श्रीमती शिल्पा ठाकूर,पुणे २३.श्रीमती मिनाक्षी नागरे,पुणे२४.श्री प्रेमानंद भागणे,पुणे २५.श्रीमती नयना जोगळेकर,पुणे

## ऑक्टोबर२०२२ मध्ये वस्तुरुपाने मदत देणारे देणगीदार

१.श्रीमती उज्वला जोशी,पुणे २.श्रीमती श्रीकांता बिहाणी,पुणे ३.श्री महेश केसवानी,पुणे४.श्रीमती गौरी दिवाकर,पुणे ५.श्रीमती

वैष्णवी थोरात,पुणे ६.श्री उमेश उमराणी,पुणे ७.श्रीमती शीला धारिया,पुणे ८.श्रीमती सोनाली जोशी,पुणे ९.श्री सुहास कुलकर्णी,पुणे १०.श्रीमती कविता कदम,पुणे ११.रामस्वामी,पुणे १२.श्री ऋषिकेश देखणे,पुणे १३.श्रीमती आरती लवाटे,पुणे १४.श्रीमती रोहिणी पालकर,पुणे १५.श्रीमती अनघा डोंगरे,पुणे १६.श्री मनोज कासट,पुणे १७.श्री शिरीष पांड्ये,मुंबई १८.श्री हर्षल शिंपी,पुणे १९.श्री शिरीष बागेवाडी,पुणे २०.श्रीमती मालती कांबळे,पुणे२१.श्रीमती राधिका जोगळेकर,पुणे २२.श्रीमती मानसी दीक्षित,पुणे २३.श्री आनंद दिवाकर,पुणे २४.श्रीमती पूनम कुलकर्णी,पुणे २५.श्री विवेक कर्वे,पुणे २६.श्रीमती सायली क्षिरे,पुणे २७.श्रीमती इंदुमती कुलकर्णी,पुणे २८.कलातीर्थ संगीत चित्रकला विद्यालय,पुणे २९श्रीमती अनघा कारखानीस,पुणे ३०.श्रीमती सरोज टोळे,पुणे ३१.हिंदु महिला सभा,पुणे ३२.श्री निरंजन सोनी,पुणे ३३.श्री ध्रुव कांबळे,पुणे ३४.डॉ.शैलेंद्र माने,पुणे ३५.श्रीमती सुनीता बावधने,पुणे

**नोव्हेंबर२०२२ मध्ये वस्तुरुपाने मदत देणारे देणगीदार**

१.श्रीमती शुभांगी धोंगडे,पुणे २.श्रीमती पल्लवी पवळे,पुणे ३.श्री चिन्मय होळकर,पुणे ४.श्रीमती श्रीकांता बिहाणी,पुणे ५.श्रीमती मोहिनी देवळे,पुणे ६.श्री रमेश जोशी,पुणे ७.श्री श्रीकांत काशीकर,पुणे ८.श्री विशाल कामठे,पुणे ९.श्री प्रमोद विपट,पुणे १०.श्रीमती देवयानी गोंगले,पुणे ११.श्रीमती कविता धुमाळ,पुणे १२.श्रीमती श्वेता बनपूरकर,पुणे १३.श्रीमती भाग्यश्री एरगुंठा,पुणे १४.श्रीमती कला पंड्या,पुणे १५.श्रीमती शांभवी गोडसे,पुणे १६.श्रीमती संगीता जोशी,पुणे १७.श्रीमती सुचित्रा कर्वे,पुणे १८.श्रीमती अश्विनी जोशी,पुणे १९.श्री शेखर सुगवेकर,पुणे २०.श्री प्रसाद सबनीस,पुणे २१.श्री अशोक लिंबोटे,पुणे २२.श्रीमती आरती लवाटे,पुणे २३.श्रीमती मानसी दीक्षित,पुणे २४.श्रीमती सायली क्षिरे,पुणे २५.एनएसएस युनिट सिंहगड इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी,नऱ्हे,पुणे २६.श्रीमती देवयानी गोंगले,पुणे २७.श्रीमती पल्लवी शेवाळे,पुणे २८.श्रीमती मेधा गोखले,पुणे २९.श्रीमती श्रीया साठे,पुणे ३०.श्रीमती प्रभावती ठकार,पुणे ३१.श्री सुभाष सोमण,पुणे ३२.श्री निशिकांत राऊत,पुणे ३३.श्री समीर करी,पुणे ३४.श्रीमती अनुप्रिती पवार,पुणे ३५.श्रीमती वसुधा दिवेकर,पुणे


# वंचित विकास

**केंद्र कार्यालय :४०५/९, नारायण पेठ, मोदी गणपती मागे, पुणे ४११०३०**

**फोन नं. : (०२०) २४४८३०५०/२४४५४६५८**

**मोबाईल नं. : ७९७२०८६७३०**

**ई मेल : vanchitvikas85@gmail.com**

**वेबसाईट : http://vanchitvikas.org**

**संस्था नोंदणी : महा/२५५३/८६(पुणे)**

**न्यास नोंदणी : एफ ३१२१ (पुणे)**



# संवादिनी

**संपादक, मुद्रक, प्रकाशक**

**वंचित विकास**

**४०५/९, नारायण पेठ, मोदी गणपतीच्या मागे, पुणे ४११०३०**

**केवळ खाजगी वितरणासाठी (विनामूल्य)**

**बुक-पोस्ट**

श्री/श्रीमती : ______________________